# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दुरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक: २/एनजीसी/मान्यता/२०१७/ १७७

दिनांक : 10 FEB 2017

पहा : १) या संचालनालयाची अधिसूचना क्रमांक २(३)/एनजीसी/मान्यता/२०१७/४८,
दि. १२ जानेवारी, २०१७
२) या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक २/एनजीसी/मान्यता/२०१७/१४७,
दि. ०३.०२.२०१७

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील ज्या विद्यमान व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी नवीन अभ्यासक्रम, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ, पीआयओ / एनआरआय च्या नवीन जागा यासाठी शिखर परिषदांकडे अर्ज केलेल्या संस्थाची दि. ०७.०२.२०१७ रोजी सुनावणी आयोजित केली होती. दि. ०७.०२.२०१७ रोजीच्या सुनावण्यासाठी ज्या संस्था उपस्थिती नव्हत्या त्यांचेसाठी या संचालनालयाच्या समिती सभागृहात खालील प्रमाणे अंतिम सुनावणी घेण्यात येणार असून यानंतर सुनावणी होणार नाही याची संबंधित संस्थानी नोंद घ्यावी.

| अ.क्र. | अर्ज / प्रस्ताव सादर केलेले समुचित प्राधिकारण | सुनावणीचा दिनांक व वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | अखिल भारतीय तंत्र शिक्षण दिल्ली / फार्मसी कौंसल ऑफ इंडीया | दि. १५.०२.२०१७ (सकाळी १०.३० ते दुपारी १.०० ) | तंत्र शिक्षण संचालनालय, समिती सभागृह, मुंबई |
| २ | वास्तूकला परिषद, नवी दिल्ली | दि. २२.०२.२०१७ (सकाळी १०.३० ते दुपारी १.०० ) | |

विद्यमान पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी वरील प्रस्तावांची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावरील माहिती भरल्यानंतर ॲप्लीकेशन पार्ट १, पार्ट २ व डेफीसिअन्सी रिपोर्ट हे दस्तावेज अपलोड करुन भलेलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करून उपरोक्त सुनावणीस उपस्थित रहावे. संबंधित संस्थानी वरील अर्जांच्या सुनावणीस येतांना खालील कागदपत्रांचे २ संच, तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद / वास्तुकला परिषद / फार्मसी कौंसिल ऑफ इंडीया यांना सादर केलेला प्रस्ताव व सदर प्रस्तावातील माहितीच्या पुष्ठर्थची मुळ दस्तावेज, सन २०१७-१८ च्या ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक मध्ये नमूद केलेल्या मानके व प्रमाणकांच्या पुष्ठर्थ आवश्यक त्या मुळ कागदपत्रासह सुनावणीस प्राचार्यांनी व्यक्तीश: उपस्थित रहावे.

१. संस्थेचा ठराव.

२. नॅशनल बोर्ड ऑफ अॅक्रीडीटेशन, नवी दिल्ली यांनी अॅक्रीडीटेशनास मान्यता दिलेल्या पत्राची साक्षांकीत प्रत
३. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विविध बाबींच्या मान्यतेसाठी शासनाने दि. २१.०८.२०१३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीची साक्षांकीत प्रत.
४. प्राचार्यांच्या नियुक्तीचे आदेश, नियुक्तीस विद्यापीठाची मान्यता व शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती.
५. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचा सेफीसिआरसी रिपोर्ट (Submitted to R.O Office ]
६. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवर केलेल्या भाग १ व भाग २ च्या अर्जाची [submitted to R.O] साक्षांकीत प्रत
७. ऑन लाईन पध्दतीने संचालनालयाच्या संकेत स्थळी माहिती भरल्यानंतर अॅनेक्सर सी व डी ची साक्षांकीत प्रत.
८. जमीन, इमारत, ओसी. इ. बाबत सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,
१) सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
त्यांना कळविण्यात येते की, या परिपत्रकातील सूचना आपल्या अधिपत्याखालील येणा-या संस्थाना आपले स्तरावरुन कळविण्यात याव्यात
२) सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित /खाजगी विनाअनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची महाविद्यालये
३) सिस्टीम मॅनेजर, कार्यासन क्रमांक ३ (संगणक कक्ष), तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई.

पृ.क्र. विकाअ/शिक्षण/सुनावणी/२०१७/391
सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.
दिनांक:- 10 FEB 2017

प्रत:- प्राचार्य, सर्वसंबंधित संस्था यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी त्यांनी उपरोक्त पत्रामध्ये नमुद सुचनेप्रमाणे कार्यवाही करावी.

सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय
अमरावती.

प्रतिलिपी:- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यासाठी

H:\Kedare\2017\Approval Process 2017_18\Final NOTIFICATION 2017.Docx